संशोधन व १९७७ मधील निवडणुका यासारखे त्यांचे निर्णय हुकूमशाही वृत्ती जोपासत असल्याचे देखील दिसून आले.

**८. सारांश:-**

इंदिरा गांधींच्या परराष्ट्र धोरणाचा चिकित्सक अभ्यास केल्यानंतर आपणास असे म्हणता येईल की, त्यांचे परराष्ट्र धोरण हे वास्तववादी होते. पंडित जवाहरलाल नेहरूंच्या काळातील असलेले आदर्शवादी परराष्ट्र धोरणात त्यांनी आमूलाग्र बदल करून तसेच मुलतत्त्वात कोणताही बदल न करता, भारताचे परराष्ट्र धोरण त्यांनी आपल्या देशाचे हित लक्षात घेऊन अधिक वास्तववादी बनविलेले दिसते. म्हणूनच देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरवर त्यांचे व्यक्तिमत्त्वाची ठसा उमटलेला आपणास दिसून येतो. म्हणूनच इंदिरा गांधीजींची ओळख एक आयर्न लेडी म्हणून केली जाते.

**संदर्भ ग्रंथ सूची:-**


१. डॉ. बी. डी. तोडकर,फ भारत आणि जग (आंतरराष्ट्रीय संबंध)फ डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती, जुलै २०१०.

२. डॉ. भोळे भास्कर लक्ष्मण,फ भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारणफ पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर, दुसरी आवृत्ती, मार्च २०१०.

३. प्रा. डॉ. बोबडे विजय,फ भारतीय शासन आणि राजकारणफ साईज्योती पब्लिकेशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, जून २०१७.

४. विविध वर्तमानपत्रे.

५. www.internet


❑❑❑

**56**

# इंदिरा गांधी - जीवन व कार्य


**प्रा. डॉ. चंद्रसेन सावळाराम आवारे**

मराठी विभाग प्रमुख,

कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा ता. जि. बीड.


**प्रस्तावना -**

भारतातील स्त्रियांचा विचार करताना वेदकाळातील स्त्रियांपासून तिचा वेध घ्यावा लागतो. वेदकालीन स्त्रियांना समाजात अधिक स्वातंत्र्य होते. त्यांना शिक्षणाचे स्वातंत्र्य होते. विवाह करण्याचे देखील स्वातंत्र्य होते. त्यामुळे उच्चवर्णीय स्त्री-पुरूष त्याकाळी प्रेमविवाह देखील करीत असत. काही स्त्रियां तर अविवाहीत देखील राहत. वेद काळात मुलींच्या विवाहाचे वय देखील कमी नसे. पण नंतर पुढे चालून विवाहाबाबत अतिरेख झाला व मुलगी लहान असतानाच पाळण्याला बासिंग बांधले जावू लागले. यातून अल्पवयीन मुलीवर वैधव्याची कुऱ्हाड कोसळली तर बाल विधवांची स्थिती अत्यंत दयनीय होत असे. यातूनच १९ व्या शतकात समाजसुधारकांच्या प्रयत्नांमुळे स्त्रियांबाबतच्या अन्यायकारक वाटणाऱ्या सती जाणे, बालविवाह, जरठ कुमारी, विधवेला अमंगल लेखणे, केशवपण, अन्याय व अत्याचार, स्त्रियांना शिक्षण नाकारणे इ. समाजातील अनिष्ठ रूढीवर हल्ला झाला व रूढी नष्ट झाल्या.

'स्त्रीचे समाजातील स्थान सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक अनेक बाबींवर अवलंबून असते. स्त्रीचा दर्जा जसा समाज व्यवस्थेशी व परिस्थितीशी निगडीत असतो, तसाच तो समाजमान्य नीतिमूल्यांवरही अवलंबून असतो.' सर्व प्राचीन संस्कृतीमध्ये सुरवातीला मातृहक्क मान्य होता आणि स्त्रियांचा दर्जा निश्चितच उच्च होता. उपनिषदात स्त्रिया न्याय मंदिरात देखील जात असून महत्त्वाची भूमिका पार पाडतानाचे उल्लेख आहेत. याचा अर्थ स्त्रिया हुशार, तत्त्वज्ञानी होत्या. समाजात त्यांना मान होता, आदराचे स्थान होते. महाभारत काळात देखील स्त्रियांना मानाचे स्थान होते. पण रामायणात मात्र तसे घडताना दिसत नाही.

ISBN 978-93-85882-65-4

२० व्या शतकात झालेल्या अनेक समाज सुधारकांच्या चळवळीमुळे स्त्रियांच्या बाबतीत अनेक चांगले कायदे केले गेले व त्यात सुधारणा घडून आल्यानंतर राजकीय क्षेत्रात, शिक्षण क्षेत्रात व कामगार क्षेत्रात स्त्रियांच्या सहभागाला सुरूवात झाली. कोणत्याही समाजाच्या उन्नतीचा विचार करताना त्या समाजामध्ये स्त्रियांना मिळणारा मान, स्थान, शिक्षण वगैरे गोष्टी लक्षात घेणे आवश्यक असते. शिक्षण संपादन करणे हा मानवी हक्का पैकी एक महत्त्वाचा हक्क आहे. आज घटनेप्रमाणे भारतीय स्त्रीला शिक्षणाची दारे खुली होऊन, ती प्रगतीपथावर गेल्याचे दिसून येते. आज स्त्रिचे विश्व केवळ चुल आणि मुल एवढेच मर्यादित न राहता शिक्षणाच्या मिळालेल्या संधीमुळे ती आज अनेक क्षेत्रात आघाडीवर असलेली पहावयास मिळते. राजकारण, चित्रपट, नाट्य, नृत्य, संगित, शिक्षण, तंत्रज्ञान क्रीडा, संशोधन व अंतराळ इत्यादी अनेक क्षेत्रात तिने आपले कर्तृत्व सिध्द केलेले आहे.

**राजकीय चळवळ : –**

भारतीय समाजातील वेदकालीन स्त्रियांना राजकारणात आपले मत मांडता येत असे. स्त्रियां राज्यकारभारही कर्तबगारीने करीत, याची इतिहास साक्ष देतो. युध्दामध्ये राजे मरण पावल्यावर जर राजाला पुत्र नसेल व मुलगीच असेल तर त्या मुलीला राज्यावर बसवावे, असे भिष्माने युधिष्ठिराला सांगितल्याचे महाभारतात वचन आहे. इतिहासातील कर्तृत्ववान स्त्रियांमध्ये प्रामुख्याने चित्तोडची राणी कर्णावती, उदयसिंहाचे रक्षण करणारी पन्नादाई, गोंडवणाची राणी दुर्गावती, मुरादच्या हल्ल्यास निकाराने तोंड देणारी अहमदनगरची शूर चाँदबेबी, राणी चन्नमा, छत्रपती शिवाजी महाराजांची आई जिजाबाई, राणी तारामती, इंग्रजांशी शेवटपर्यंत निकाराने लढाई करणारी राणी लक्ष्मीबाई, अहिल्याबाई होळकर इत्यादींचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. भारतीय राजकारणात देखील डॉ. अॅनी बेझंट, सरोजिनी नायाडू, श्रीमती मथुलक्ष्मी रेड्डी व श्रीमती इंदिरा गांधी या सारख्या कर्तृत्ववान महिला होऊन गेल्या आहेत. त्यांनी भारतीय राजकारणावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा कायमचा उठवलेला पहावयास मिळतो.

**इंदिरा गांधी : –**

भारताच्या पहिल्या लोकप्रिय महिला पंतप्रधान म्हणून श्रीमती इंदिरा गांधी यांचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. त्यांच्या वडिलांचे नाव जवाहरलाल नेहरू तर आईचे नाव कमला नेहरू होते. या दांम्पत्याच्या पोटी १९ नोव्हेंबर १९१७ अलाहाबाद येथे त्यांचा जन्म झाला. नेहरू कुटूंब काश्मिरी ब्राम्हण कुटूंब म्हणून त्याकाळी प्रसिध्द होते. इंदिराजीचे आजोबा मोतीलाल नेहरू, पिता पंडित जवाहरलाल नेहरू व आई कमला नेहरू हे सारे कुटूंबच त्यावेळी भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील एक अग्रगण्य कुटूंब होते. सहाजिकच आजोबा, वडील या बरोबरच आई कमला, आत्या विजयालक्ष्मी व कृष्णा हाथिसिंग ह्या सर्वच चळवळीत पडल्या होत्या. बालपणापासूनच त्यांना क्रियाशील राजकारणाचे धडे घरीच मिळू लागले, त्यांचे प्राथमिक शिक्षण अलाहाबाद येथे झाल्यानंतर पुढील शिक्षणासाठी त्यांना पुणे, मुंबई, रविंद्रनाथ टागोर यांचे शांतिनिकेतन, समरव्हील महाविद्यालय (ऑक्सफर्ड), स्वित्झर्लंड वगैरे ठिकाणी ठेवण्यात आले. महाविद्यालयीन शिक्षण कौटूंबिक अस्थिरता, तंग जागतिक वातावरण व राजकीय चळवळ यामुळे इंदिराजी पुर्ण करू शकल्या नाहीत. तरी सुध्दा विद्वान पित्याच्या तसेच त्यांच्या सानिध्यातील इतर विद्वान व्यक्तीच्या सहवासामुळे त्यांना पारंपारिक शिक्षणापेक्षा विविध विषयाचे ज्ञान मिळवण्याची संधी मिळाली. याशिवाय त्यांनी विविध देशांना कधी आजोबा बरोबर तर कधी वडिलांबरोबर भेटी दिल्या त्यामुळे त्यांना अनेक सामाजिक व राजकीय समस्यांचे ज्ञान प्राप्त झाले.

वयाच्या १२ व्या वर्षी त्यांना 'चरका संघ' व लहान मुलां-मुलींची 'वानर सेना' नावाची संघटना स्थापन केली. आणि महात्मा गांधीच्या सविनय कायदे मंडळ चळवळीस मदत केली. त्यावेळी वानर सेनेची सभासद संख्या सुमारे ६०,००० होती. त्यांच्या या वानर सेनेचे फार कौतुक झाले. त्यांना कॉंग्रेसचे सभासदत्व १९३८ पर्यंत अधिकृतरित्या मिळाले नाही. कारण १८ वर्षे ही सभासत्वाची किमान वयोमर्यादा असे. तरीही त्या चळवळीत सहभागी झाल्या. ऑक्सफर्डमध्ये शिकत असताना त्यांनी व्ही. के. कृष्ण मेनन यांच्या बरोबर इंग्लंडमध्ये भारतीय स्वातंत्र चळवळीचा पुरस्कार केला. याच सुमारास फिरोज गांधी या एका पारसी तरूणाची मैत्री व ओळख झाली. १९४२ मध्ये मैत्रीचे विवाहात रूपांतर झाले. नंतर दोघांनीही १९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनात सहभाग घेतला, तेव्हा त्यांना अटक झाली पण काही दिवसातच त्यांना सोडण्यात आले. लग्नानंतर त्यांनी लखनौ येथे राहण्याचे ठरवले. फिरोज गांधी हे 'नॅशनल हेराल्ड' या नेहरूंनी सुरू केलेल्या वृत्तपत्राचे संपादक झाले. लखनौला काही दिवस राहून त्या प्रसुतीकरीता १९४४ मध्ये आत्या कृष्णा हाथिसिंग

ISBN 978-93-85882-65-4

यांच्याकडे मुंबईस आल्या. तेथेच राजीव या मुलाचा जन्म झाला. काही दिवसानी संजीव हा दुसरा मुलगा त्यांना झाला.

१९४७ साली भारत स्वतंत्र झाल्यावर सर्वत्र जातीयवादाने थैमान घातले. त्यावेळी दिल्लीच्या दंगलग्रस्त भागात शांतता प्रस्थापित व्हावी, म्हणून त्यांनी आटोकाट प्रयत्न केले. इंदिराजींनी यापुढे आपल्या वयोवृध्द वडिलांजवळ राहून त्यांची सेवा करण्याचे ठरवले. नंतर फिरोज गांधीही दिल्लीत रहावयास आले व पुढे ते लोकसभेचे खासदार झाले.. इंदिरा गांधींनी १९५० ते १९५९ ही नऊ वर्षे पंडित जवाहरलालांचा स्विय सहाय्यक, एतद्देशीय व परकीय पाहुण्यांचे स्वागत करणे, तसेच वडिलांच्या प्रकृतीची काळजी वाहणे या कामात गेली. त्या काळात त्यांनी नेहरू बरोबर अनेक देशाचे अधिकृतरित्या दौरे केले. त्यानिमित्ताने आंतरराष्ट्रीय मातब्बर व्यक्तींशी त्यांचा परिचय झाला. आणि आंतरराष्ट्रीय समस्यांवर त्यांच्याशी विचार विनिमय करण्याची संधी त्यांना लाभली. आफ्रिका व रशिया यांचा सदिच्छा दौरा त्यांनी केला. त्या काँग्रेस कार्यकारणीच्या १९५५ मध्ये सदस्या झाल्या. तसेच स्त्रियांच्या समितीच्या अध्यक्षा झाल्या. नंतर थोड्याच दिवसात त्या मध्यवर्ती निवडणूक मंडळ, मध्यवर्ती संसदीय मंडळ याच्या देखील सदस्य झाल्या. या शिवाय त्यांनी युनेस्को कार्यकारीणी, शैक्षणिक मंडळ, शिशु कल्याण वगैरे अनेक मंडळांवर व समित्यांवर सभासद म्हणून काम केले.

१९५९ व १९६० अशी दोन वर्षे लगातार त्यांची अखिल भारतीय काँग्रेसच्या अध्यक्षा म्हणून निवड झाली. नेहरू घराण्यातील त्या काँग्रेसच्या तिसऱ्या अध्यक्षा ठरल्या. १९६० नंतरही त्यांनी काँग्रेसच्या अध्यक्षा म्हणून रहावे अशी सर्वांची इच्छा होती. परंतू आपल्याला पंडित नेहरूजवळ राहून ही सर्व जबाबदारी पार पाडणे शक्य नाही, या सबबीवर त्यांनी नकार दिला. अध्यक्षीय कारकीर्दीत त्यांनी भाषावार प्रांतरचनेचा अभ्यास करून, राज्याराज्यातून दौरे काढून जनमत आजमावले व काही भाषिक प्रांतांची योजना मांडली. त्यातूनच संयुक्त महाराष्ट्र जन्माला आला. या सुमारास केरळ राज्यात कम्युनिष्टांची राजवट होती ती उलथवून पाडण्याचे यशस्वी प्रयत्न त्यांनी केले. त्याचे श्रेय म्हणजे १९६२ च्या सार्वजनिक निवडणुकीत काँग्रेसला केरळ राज्यात घवघवीत यश मिळाले.

पंडित नेहरूंच्या मृत्यूनंतर १९६४ मध्ये लालबहादूर शास्त्री पंतप्रधान झाले, त्यावेळी इंदिराजींना परराष्ट्रीय खाते घेण्याविषयी विनंती करण्यात आली. परंतू एकूण कोणतीही अधिकाराची व पदाची जागा घेण्याच्या मनःस्थितीत आपण नाही असे त्यांनी सांगितले. काही दिवसांनी माहिती व नभोवाणी खात्याचे मंत्रीपद त्यांच्याकडे सुपूर्त करण्यात आले. एक दीड वर्षात त्यांनी भारतीय नभोवाणी खात्यात अनेक मौलिक सुधारणा केल्या आणि अद्यावत उपकरणांनी नभोवाणी खाते सुसज्जही केले. भारतात प्रथमच दिल्लीमध्ये दूरचित्रवाणीची सुरवात त्यांनी केली. तसेच त्यांनी अधिकृतरित्या ग्रेट ब्रिटन, युगोस्लाव्हिया, रशिया वगैरे देशांना भेटी दिल्या. तसेच तिसऱ्या आंतरराष्ट्रीय चित्रपट उत्सव समितीचे अध्यक्षपद भूषविले. राष्ट्रकुल परिषदेस त्या हजर राहिल्या. १९६५ च्या भारत–पाक युध्दाच्या वेळी संरक्षणाच्या निरनिराळ्या समित्यांवर त्यांनी काम केले. प्रत्यक्ष रणभूमीवर जाऊन जवानांची विचारपूस केली. नाटक अकादमीच्याही त्या अध्यक्ष झाल्या. भारतीय व परदेशी विद्यापीठांनी सन्माननीय 'डॉक्टरेट' ही पदवी बहाल करून त्यांचा बहुमान केला. याशिवाय त्यावर्षी मदर्स अॅवार्ड, इझाबेला डीएस्टे इ. मानपदे तसेच १९७२ साली 'भारतरत्न' हा सर्वोच्च पुरस्कार त्यांना देण्यात आला.

लालबहादूर शास्त्रीच्या मृत्यूनंतर १९६६ मध्ये इंदिरा गांधींची संसदेच्या नेतेपदी काँग्रेसमधील बऱ्याच अंतर्गत वादानंतर निवड झाली. यावेळीच काँग्रेसमधील दोन विरूध्द गटांची रस्सीखेच त्यांच्या लक्षात आली. पंडित जवाहरलाल नेहरू व लालबहादूर शास्त्री या दोन थोर नेत्यानंतर इंदिरा गांधी भारताच्या पंतप्रधान झाल्या. नेहरूंची परंपरा व लोकप्रियता इंदिरांजीच मागे होती. या सुमारास काँग्रेसमध्ये अंतर्गत कलह चालू होते. 'ताश्कंद करार' भारतीय जनतेस आणि विरोधी पक्षांना मान्य नव्हता, नव्हे ही भारताची मानहानी आहे असे त्यांना वाटत होते. त्याचे पालन करण्याची नैतिक जबाबदारी शिरावर घेऊन त्यांनी बिकट प्रसंगी अनेक समस्यांना तोंड देण्याचे ठरवले. या सर्व परिस्थितीत त्या धैर्याने टिकून राहिल्या आणि १९६७ च्या सार्वजनिक निवडणूकीत काँग्रेसला संसदेत पुन्हा बहूमत मिळवून दिले व त्यांचीच बहुमताने पंतप्रधान म्हणून निवड झाली.

१९६७ मध्ये आठ राज्यात काँग्रेसचा दारून पराभव झाला. हा पराभव जून्या नेत्यांच्या चुकीच्या धोरणामुळे झाला, असे काँग्रेसची डाव्या मतांची मंडळी म्हणून लागली. त्यामुळे काँग्रेसमध्ये अंतर्गत दुही वाढत होती. अशातच बेंगलोर येथील १९६९ च्या श्रेष्ठींच्या परिषदेत राष्ट्राध्यक्षांच्या उमेदवारीवरून तिला तोंड फुटले. काँग्रेसच्या अधिकृत

ISBN 978-93-85882-65-4

उमेदवाराविरुध्द व्ही. व्ही. गिरींनी स्वतंत्र निवडणुक लढविली आणि इंदिराजींनी पाठींबा देऊन गिरींना निवडून आणले. त्यामुळे कॉंग्रेसमधील दुफळी अटळ होती, ती झाली आणि इंदिरा विरोधी लोकांना मंत्रीमंडळातून जावे लागले. अखेर नवकॉंग्रेसचे मंत्रीमंडळ द्रविड मुन्नेत्र कळघमच्या आधाराने सत्तेवर टिकून राहीले. ही लवचिक परिस्थिती बरी नाही म्हणून 'गरिबी हटाओ' ची घोषणा नवकॉंग्रेसने देऊन इंदिराजींनी १९७१ मध्ये लोकसभेच्या मध्यावर्ती निवडणुका घेतल्या. त्यामध्ये कॉंग्रेसला तीन चतुर्थांश बहुमत मिळाले व त्या पुन्हा पंतप्रधान झाल्या. या अवधीत त्यांनी दहा मुद्यांच्या कार्यक्रमानुसार अनेक महत्त्वाची विधायके मंजूर करून घेतली. तत्पुर्वी भारतातील १४ महत्त्वांच्या बँकांचे राष्ट्रपतीच्या वटहुकूमाने राष्ट्रीयिकरण करून समाजवादाची आपली भूमिका जनतेसमोर ठामपणे मांडली. याच धोरणानुसार भारतातील राजे रजवाड्यांचे तनखे बंद केले आणि लघुउद्योग धंद्यांना प्रोत्साहन देण्याकरीता अनेक लहानसहान योजना त्यांनी संसदेत मंजूर करून घेतल्या.

१९७१ च्या सुरूवातीस पुर्व व पश्चिम पाकिस्तान यांच्यामध्ये यादवी युध्दास प्रारंभ झाला. पुर्व पाकिस्तानातून सुमारे एक कोटी निर्वासीत भारतात आले. या निर्वासीतांचा प्रश्न व पुर्व पाकिस्तानातील नागरिकांवर होणारे अमानुष अत्याचार व अन्यायाविरूध्द आंतरराष्ट्रीय मत अजमाविण्यासाठी त्यांनी जगातील महत्त्वाच्या देशांना भेटी दिल्या आणि भारताची धर्मनिरपेक्ष व शांतताप्रिय भूमिका स्पष्ट केली. भारताला पाकिस्तान सोबत युध्द करण्याशिवाय आता पर्याय उरला नाही. अशातच इंदिराजींनी रशियाबरोबर मैत्रीचा करार केला. पाकिस्तानने ३ डिसेंबर १९७१ राजी भारताविरूध्द युध्दाची घोषणाकरून भारतावर आक्रमण केले. भारतीय फौजांनी मुक्तिवाहिनीच्या मदतीने १४ दिवसाचे युध्द करून पाकिस्तानचा दारून पराभव केला व ढाका शहर चौदा दिवसांनी पडले आणि भारताने एकतर्फी युध्दबंदी जाहीर केली. यावेळी सुमारे ९५ हजार पाक सैन्य जेरबंद झाले आणि भारताने स्वतंत्र बांगला देशाला प्रथम मान्यता दिली. भारताने बांगला देशाशी मैत्रीचा करार केला. १९७२ च्या राज्यांच्या सार्वजनिक निवडणूकीत नवकॉंग्रेसला भरघोस यश मिळाले. मात्र यावेळी पाकिस्तानात अमुलाग्र बदल झाले. याह्याखान जाऊन झुलफीखारखान भुट्टो अध्यक्ष झाले. भुट्टो बरोबर इंदिराजींनी जुलै १९७२ मध्ये 'सिमला करार' केला आणि दोन्ही देशांनी सर्व प्रश्न सलोख्याने सोडवावेत असे ठरले. इंदिराजींनी विजयी राष्ट्राची ताठर भूमिका सिमला कराराच्या वेळी कधीही अनुभवली नाही.

युध्द, अवर्षण, पूर इत्यादी आपत्तीमुळे निर्माण झालेल्या संकटांना तोंड देण्यासाठी नवनवीन योजना शोधून काढीत. कमाल जमीनधारणा व शहरी संपत्तीवर मर्यादा यांचा त्यांनी पुरस्कार केला होता. गरीबी हटावच्या धोरणाने बहुसंख्य गरीबांना अन्न, वस्त्र व निवारा या प्राथमिक गोष्टी तरी मिळतील या दृष्टीने त्या सतत प्रयत्नशील राहिल्या. बांगला देशाच्या निर्मिती नंतर भारताची प्रतिष्ठा व वर्चस्व आशियाई देशात वाढले. इंदिराजींच्या पंतप्रधान पदानंतर भारतीय राजकारणातील शिथिलता जाऊन त्यात खूप गतिमानता आली, हे इंदिराजीमुळे शक्य झाले हे त्यांच्या टिकाकारांनाही मान्यच करावे लागते.

इंदिराजींचे आजोबा मोतीलाल, वडिल पंडित जवाहरलाल व आई कमला हे सर्वजन भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील चळवळीशी सतत संबंधीत राहिले होते. त्या सर्वांचे भारत देशावर खूप प्रेम होते. हाच वसा व वारसा इंदिराजींनी जोपासला होता. त्यांचेही भारतावर खूप प्रेम होते. त्या तन-मन-धनाने, जीवाची पर्वा न करता देशासाठी अविरत कष्ठ घेत राहिल्या. देशात शांतता राहावी म्हणून सतत प्रयत्नशील राहिल्या. आपल्या देशाच्या कर्तृत्वापुढे त्यांनी आपल्या जीवाची कधीही पर्वा केली नाही. त्या मरणाला कधीही डगमगल्या नाहीत. कारण त्या खुपच धाडसी व करारी होत्या. पाक सैन्याने जेव्हा भारतावर आक्रमण केले तेव्हा त्या सिमलामध्ये होत्या. त्यांना सुरक्षा म्हणून सिमला सोडून दिल्लीला जाण्यास सांगण्यात आले होते. पण त्यांनी सिमला सोडले नाही. त्या आपली प्रत्येक दिपावली भारतीय सैनिकांसोबत सीमेवर साजरी करत. त्या म्हणत, ''माझे माझ्या देशावर खूप प्रेम आहे. देशासाठी मला वीर मरण आले तरी चालेल पण मी मागे हटणार नाही. मी माझ्या देशासाठी हुतात्मा झाले तरी माझ्या रक्ताचा प्रत्येक थेंब न् थेंब देश हितासाठीच कामी येईल.''

१९७७ साली त्यांनी भारत देशात आणिबाणी लागू करण्याचा वादग्रस्त निर्णय घेतला. यावेळी अनेक विरोधी नेत्यांना त्यांनी तुरूंगात टाकले. तशातच पंजाबमध्ये खलिस्तान चळवळ खूप फोपावलेली होती. खलिस्तान चळवळीतील शीख अतिरेकी अमृतसर मंदिराचा आधार घेऊन खलिस्तान चळवळीला उग्र स्वरूप देत होते. यावेळी इंदिराजींना अशांत पंजाबचा भयंकर सामना करावा लागला. शेवटी इंदिरा गांधींनी

ISBN 978-93-85882-65-4

ऑपरेशन 'ब्ल्यू स्टार' करून सैन्याच्या मदतीने खलिस्तान चळवळ मोडून काढली. सैन्य अमृतसर मंदिरात घुसविल्यामुळे शीख बंडखोर संतप्त झाले. त्याचाच परिणाम म्हणून ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी त्यांच्याच दोन शीख सुरक्षा रक्षकाकडून जवळून गोळ्या झाडून त्यांची हत्या करण्यात आली. अशा रितीने भारतातील एका महान महिला पर्वाची समाप्ती झाली.

**संदर्भ –**


१) मराठीतील स्त्री आत्मचरित्रांचा सामाजिक अंगाने अभ्यास – श्रुती श्री. वडगबाळकर – श्री विद्या प्रकाशन शनिवार पेठ पुणे – २००६
२) भारतीय समाजरचना – प्रा. डॉ. सुधा काळदाते – भारत मुद्रांक आणि प्रकाशन, औरंगाबाद – १९७६ पान क्र. १२५
३) डिअर टू बेहोल्ड – हाथिसिंग कृष्णा नेहरू – लंडन – १९६९
४) आम्ही नेहरू – हाथिसिंग कृष्णा नेहरू – मुंबई – १९६७
५) नेहरू नंतरचा भारत – कुलदीप नायर – मुंबई – १९७५
६) पंतप्रधान इंदिरा गांधी – बुध्दिसागर शांता – पुणे – १९७२


❑❑❑

**57**

# इंदिरा गांधी : स्त्री व कार्य


**डॉ.राम प्र. ताटे**
*राज्यशास्त्र विभाग*
महिला कला महाविद्यालय, बीड

**डॉ.अर्चना शिवाजीराव वाघमारे**
भूगोल विभाग प्रमुख
महिला कला महाविद्यालय, बीड


भारतीय स्वातंत्र्य प्राप्तीनंतर पहिल्या पंतप्रधान म्हणून इंदिरा गांधी यांचा नामोल्लेख करावा लागतो. त्या भाषा प्रभू होत्या. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, विभाग, तंत्रज्ञान या सर्वच शाखांची त्यांची समज चांगली होती. जगातील शास्त्रज्ञ, तत्वज्ञ, डॉक्टर, इंजिनिअर, मुत्सद्दी, मंत्री आणि सारस्वत या सर्वांच्या परिषदेत त्यांची अर्थ संपन्न भाषणे अतिशय प्रभावित ठरत होती. त्या भाषणे वाचत नसत तर प्रत्यक्ष बोलत असत असे व्यतिमत्व लाभलेली व्यक्ति राजकारणात क्वचित आढळून येते.

इंदिरा गांधी : स्त्री व कार्य हा संशोधन पेपर लिखाणामध्ये प्राथमिक संशोधन तंत्रामध्ये काही निवडक संदर्भ ग्रंथाचा अवलंब केला असून द्वितिय संशोधन तंत्रामध्ये काही मासिके, सप्ताहिके, वर्तमान पत्राचा अवलंब करुन सदरील पेपर लिहिण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

1947 साली देशाची फाळणीसह स्वातंत्र्य मिळाले पंडीत जवाहरलाल नेहरु भारताचे पंतप्रधान म्हणून निवडले गेले. इंदिरा गांधी पंतप्रधानांच्या विशेष सचिव म्हणून कार्य करु लागल्या सन 1949, 1953, 1954 मध्ये नेहरु परदेश दौऱ्यावर गेले असताना इंदिरा गांधी त्यांच्या सोबत असत इंदिराजी अगदी आरंभापासूनच काँग्रेसच्या निशाणाखाली नांदन होत्या. सन 1955 मध्ये काही काँग्रेस पक्ष श्रेष्ठींनी त्यांना काँग्रेस वर्कींग कमेटीवर घेतले त्यानंतर त्या पार्लमेंटरी बोर्डाच्या सभासद झाल्या. सन 1959 मध्ये त्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अध्यक्षा झाल्या हे

ISBN 978-93-85882-65-4

Impact Factor – 7.139 ISSN – 2348-7143

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

November 2020 Special Issue- 29 Vol. I

# Human Rights

**Chief Editor**
**Mr. Arun B. Godam**

**Guest Editor**
**Principal Dr. Kishan Pawar**

Shaurya Publication, Latur

71. आधुनिक मराठी साहित्यातील मानवतावादी मूल्यविचार 197
डॉ.कैलास इंगळे

72. मराठी साहित्यातील मानवाधिकार व मानवी मुल्ये 199
प्रा. डॉ. आवारे सी. एस.

73. मध्ययुगीन संत तुकारामांची अभंगवाणी: मानवाधिकार आणि मूल्ये 202
प्रा. डॉ. भा. भा. नेटके

74. दलित साहित्यातील मानवाधिकार व मूल्ये 206
प्रा. रामेश्वर चाटे

75. दलित साहित्यातील मानवताधर्म आणि मूल्ये 208
डॉ. सुखदेव इधारे

76. मध्ययुगीन महानुभाव साहित्यातील विचारधारा व मानवी हक्क - एक अन्वय 210
डॉ. अण्णा वैद्य

77. संत कबीरांच्या साहित्यातील मानवाधिकार मूल्ये 213
डॉ. डुंबरे दत्तात्रय प्रभाकर

78. ग्रामीण साहित्यातील मानवाधिकार मूल्ये 217
प्रा. डॉ. बाळासाहेब जाधव

79. ग्रामीण साहित्यातील मानवाधिकार मुल्ये 219
प्रा. डॉ. राजाभाऊ भाऊसाहेब धायगुडे

80. ग्रामीण साहित्यातील मानवाधिकार व मूल्य 221
कैलास मच्छिंद्रनाथ होके

81. ग्रामीण साहित्यातील मानवाधिकार मूल्ये 223
प्रा. डॉ. लक्ष्मण गित्ते

82. संत साहित्यातील मानवाधिकार व मानवी मूल्ये 225
प्रा. डॉ. रामहारी मायकर

83. मानवाधिकार आणि दलित साहित्य 227
सखाराम शहादेव शिंदे, प्रा.डॉ. गणेश मोहिते

84. स्त्रीवादी साहित्यातील मानवाधिकार व मूल्य 229
प्रा. डॉ. हरीशचंद्र मधुकर गायकवाड

85. मराठी साहित्य आणि मानवाधिकार 231
डॉ. राजाराम झोडगे

86. वारकरी संप्रदाय आणि मानवाधिकार 234
प्रा. डॉ. भारत विठ्ठलराव शिंदे

87. उपेक्षित संत कवयित्रींच्या अभंगांतून आलेल्या मानवीमूल्यांचे अभिव्यक्तीचे स्वरुप 237
गणेश मारेवाड

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 29 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
November 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# मराठी साहित्यातील मानवाधिकार व मानवी मुल्ये

**प्रा. डॉ. आवारे सी. एस.**
(मराठी विभाग प्रमुख), कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा,

---

**प्रस्तावना : -**

भारत हा जगातल्या लोकशाही राष्ट्रापैकी एक आहे. लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी सर्वच लोकशाही राष्ट्रांना अनेक प्रकारचा संघर्ष करावा लागला आहे. देशात लोकशाही राजवट असली तरी लोकशाहीच्या मूलभूत तत्वांना काळीमा फासणाऱ्या अनेक घटना घडताना दिसून येतात. भारताच्या संदर्भात भारतीय संविधानात मूलभूत हक्कांचा, अधिकारांचा समावेश केला आहे. व्यक्तीला स्वतःच्या अंतःप्रवृतीनुसार जीवन जगता यावे, अंगच्या गुणांचा विकास करता यावा यासाठी प्रत्येक व्यक्तीला, मानवाला काही किमान अधिकाराची आवश्यकता असते. या अधिकाराशिवाय व्यक्तीला स्थैर्य व स्वास्थ लाभून जीवनाचा विकास साधता येणार नाही. म्हणून व्यक्तीला अश्या काही मूलभूत हक्क व अधिकाराची गरज भासत असते.

व्यक्तीच्या मूलभूत हक्क व अधिकारामुळे राज्यसत्तेवर नियंत्रण येते. व्यक्ती विकासाच्या आड येतील असे कायदे राज्यसत्ता लागू करू शकत नाही. यासाठीच लोकशाही देशात मूलभूत अधिकार संविधानामध्ये नमूद केलेले आहेत. स्वातंत्र्य, समता व बंधुता ही मुल्ये फ्रान्सच्या लोकशाहीने जगाला दिली आहेत. भारतीय संविधानाच्या तिसऱ्या भागात मूलभूत हक्क व अधिकार नमुद करण्यात आलेले आहेत. हे मूलभूत हक्क हिरावून घेतले जातील किंवा त्यावर मर्यादा पडेल असा, तसेच मूलभूत हक्कांशी विसंगत ठरेल असा कायदा रद्दबातल ठरविणारे कलमही या भागात समाविष्ठ करण्यात आले आहे. घटनेने जसे सत्ता केंद्राच्या मनमानी व्यवहारापासून व्यक्तीचे संरक्षण केले आहे. तसेच समतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, बंधुत्वाचा हक्क, शोषणाविरूध्दचा हक्क, धार्मिक, सांस्कृतिक स्वातंत्र्याचा हक्क याबरोबरच संरक्षणाची हमी देणाऱ्या हक्कांचाही समावेश करण्यात आला आहे.

लोकशाही राजवटीत राज्यसत्तेने जूलमी बनू नये म्हणून मूलभूत हक्कांची, अधिकारांची हमी व्यक्तीच्या दृष्टीने आवश्यक असली तरी व्यक्तीचे हक्क ही अमर्याद असू शकत नाही. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे. एका व्यक्तीचे स्वातंत्र्य, अधिकार व हक्क दुसऱ्या व्यक्तीच्या हक्कांच्या व अधिकार स्वातंत्र्याच्या आड येता कामा नये. तसेच व्यक्तीचे हक्क सार्वजनिक शांतता, सुव्यवस्था, राष्ट्राची सुरक्षितता, व्यापक समाजहित यांच्याही आड येता कामा नये. परचक्र, युध्द, अंतर्गत बंडाळी अशा प्रसंगी सार्वजनिक हिताच्या दृष्टीने व्यक्तीच्या मूलभूत हक्क, अधिकार यावर बंधने घलणे आवश्यक ठरते. या सर्व मुद्यांचा विचार भारतीय संविधानात केलेला दिसून येतो.

लोकशाहीमध्ये नागरिकांना काही हक्क आणि कर्तव्ये असतात. जेव्हा या हक्कांचे आणि कर्तव्याचे रक्षण केले जाते तेव्हाच लोकांना स्वातंत्र्य मिळते असे मानले जाते. हक्क म्हणजे लोकांना शासनामार्फत मिळालेले विशेषाधिकार होत. मनुष्याला जगण्यासाठी काही हक्कांची आवश्यकता असते. तसेच उच्चतम व्यक्तिमत्व विकासासाठी काही विशिष्ठ हक्क अधिकार आवश्यक असतात. हेरॉल्ड लास्की यांच्या मते "हक्क म्हणजे सामाजिक जीवनातील अशी परिस्थिती की ज्याच्याशिवाय कोणतीही व्यक्ती स्वतःचे जीवन उत्तम प्रकारे जगू शकणार नाही."

मानवी हक्क अधिकाराचे नैसर्गिक हक्क, नैतिक हक्क व वैधानिक हक्क असे वर्गीकरण करता येईल. शिक्षणाच्या अधिकारांचा समावेश मूलभूत हकांच्या यादीत २००२ साली झालेल्या ८६ व्या घटना दुरूस्तीने करण्यात आला. भारताच्या मूळ संविधान संपत्तीच्या हक्काचा समावेश होता. १९७८ साली झालेल्या ४४ व्या घटना दुरूस्तीने संपत्तीचा हक्क मूलभूत हक्कामधून वगळण्यात आला आहे. आता कलम ३०० (अ) नुसार त्याला वैधानिक हक्काचा दर्जा देण्यात आला आहे.

१० डिसेंबर १९४८ रोजी संयुक्त राष्ट्राने मानवी हक्कांचा वैश्विक जाहिरनामा घोषीत केला. या जाहिनराम्यात नैसर्गिक आणि नागरी हक्कांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला आहे. शिवाय मानवाला आवश्यक असलेले स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधूभाव यांचा समावेश केला आहे. मानवी हक्क व अधिकाराची अंमलबजावणी करण्यासाठी सामाजिक, राजकीय आणि आर्थिक परिस्थिती अनुकूल असणे गरजेचे असते. मानवी हक्कांची अंमलबजावणी करणे अवघड असते. म्हणून जगात अनेक देशामध्ये मानवी हक्कांची पायमल्ली होताना दिसते. अमेरिकेत अजूनही कृष्णवर्णीय लोक समान दर्जा मिळविण्यासाठी लढत आहेत. भारतात अजूनही जातीच्या आधारावर भेदभाव केला जात असल्याचे दिसून येते. अनेक देशात स्त्रियां आणि बालकांची स्थिती दयनीय आहे. त्यांना त्यांचे हक्क मानवी हक्क जाहिरमान्याप्रमाणे मिळताना दिसत नाहीत.

प्रत्येक व्यक्तीला मानव म्हणून काही मूलभूत हक्क, अधिकार मिळतात, यांना मानवी हक्क म्हणतात. हे हक्क आपल्याला जन्मतःच मिळतात. ते आपल्यापासून कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. ते आपल्याला कोणा समाजाने अथवा राज्यकर्त्याने दिलेले नसतात. म्हणजेच मानवी हक्क, अधिकार आपल्यापासून विलग करता येत नाहीत. मानवी हक्क हे नैसर्गिक असतात व ते न्यायावर आधारीत असतात. मानवी हक्क हे सार्वजनिक आहेत आणि सामाजिक भेदभाव न करता सर्व मानवांना हे हक्क दिले जातात. मानवी गुणांचा, बुध्दीमत्तेचा व कौशल्याचा विकास होण्यासाठी या हक्काची गरज असते. माणसाची व मानवी आयुष्याची प्रतिष्ठा आणि मूल्ये यांचे संवर्धन होण्यासाठी हे हक्क असणे आवश्यक मानले जातात.

***दलित साहित्य : -**

जीवन आणि साहित्य यांचा संबंध फार जवळचा असतो. कोणत्याही साहित्याच्या निर्मितीची बीजे जीवनातील वास्तवात असतात आणि जीवनाच्या जडणघडणीत साहित्याचा ही वाटा असतो. एवढेच नाही तर समाज आणि संस्कृती यांच्या घडणीमध्येही साहित्याचा वाटा असतो. याचे कारण असे की साहित्याचा निर्माता असलेला कवी किंवा लेखक हा स्वतःच समाजाचा घटक असतो. त्याच्या मनात उठणारी भाववलये, विचारवलये त्याच्या परिने त्याच्या साहित्यात तो नोंदवित असतो. याला दलित लेखकही अपवाद असण्याचे कारण नाही. दलित शब्दाची व्युत्पती समजून घेण्यासाठी चातुवर्ण्य समाज व्यवस्था समजून घ्यावी लागते. या चातुवर्ण्यरूपी जात्यात भरडल्या गेलेले, चिरडल्या गेलेले, दळले गेलेले किंवा जात असलेले ते सर्व दलित. दळण-दळीत = दलित अशी दलित शब्दाची उत्पती सांगता येते. 'मानवी हक्क व

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 29 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
November 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

अधिकारापासून वंचित राहिले व ज्याची पिळवणूक होते त्यांना दलित म्हणतात येईल.' या संदर्भातील तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात की, "मानवी प्रगतीत सर्वात मागे राहिलेला, रेटलेला सामाजिक वर्ग म्हणजे दलित होय."

दलित साहित्याच्या निर्मितीमागचा हेतू केवळ मनोरंजन नसून त्याचा हेतू स्वतःला आणि स्वतःच्या समाजाला पारंपारिकतेच्या मगरमिठीतून बाजूला करणे, सोडविणे हा आहे. त्यामुळे दलित साहित्यामधून सामान्यतः भावना अभिव्यक्तीला फारसे स्थान नाही, त्यापेक्षा विचार प्रकटनाला अधिक महत्व आहे. दलित साहित्याच्या प्रेरणास्थनी तथागत गौतमबुध्द, म. जोतीराव फुले, कार्ल मार्क्स आणि मुख्यत्वे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भूतदयावादी व मानवतावादी विचारच आहेत.

बौध्द विचार हा सामाजिक क्रांतीचा आणि परिवर्तनाचा विचार आहे. एकूण बौध्द तत्वज्ञानच बुध्दीवादी आणि तर्क यांच्या कसोटीवर आधारलेले आहे. या तत्वज्ञानात समतेला महत्व दिलेले आहे. तसेच व्यक्तीचे स्वातंत्र्य, शांती, अहिंसा आणि सत्य यांनाही महत्व दिले आहे. कार्ल मार्क्सने साम्यवादाचा पुरस्कार केला. त्याच्या मते साम्यवादामुळे समाजातील सर्व स्त्री-पुरूषांना आपला विकास साधता येतो. मात्र त्यासाठी शोषकाविरूध्द संघर्ष करावा लागतो. तो केल्याशिवाय शोषितांची प्रगती होत नाही. दलित साहित्यातून दिसून येणारा नकार आणि विद्रोह म्हणजे मार्क्सच्या आदर्श समाज व्यवस्थेच्या कल्पनांना मूर्तरूप देण्यासाठी चालविलेल्या संघर्षाची प्रधान सुत्रे आहेत. दारिद्र्य आणि भूक यांचे चित्रण दलित साहित्यात मोठ्या प्रमाणात येते, याला मूळ कारण म्हणजे डॉ. आंबेडकरांनी स्विकारलेली मार्क्सची विचारसरणीच होय.

महात्मा जोतीराव फुल्यांनी हिंदू धर्मातील मानसिक व सामाजिक गुलामगिरीविरूध्द बंड केले. शिक्षण समानता व सर्वांना समान संधी यासाठी त्यांनी बंड केले. समता व बंधूत्व यांचा त्यांनी पुरस्कार केला. दलित साहित्य हे ईश्वर, आत्मा, कर्मविपाक, अध्यात्म, वर्ण आणि जाती व्यवस्था यांना नकार देते. ते हिंदू परंपरा, रूढी, वाईट चालीरिती यांच्याविरूध्द बंड पुकारते, हाच विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिकवणूकीमधून आलेला आहे. 'शिका, संघटीत व्हा व संघर्ष करा' हा संदेश त्यांनी दलित बांधवाला दिला आहे. त्यांनी दलितांना बलुतेदारी सोडून स्वतंत्र जीवन जगण्याचा उपदेश केला. मानवमुक्ती, स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या मुल्यांचा पुरस्कार केला. दलितांच्या मनात आत्मसन्मान, आत्मविकास, आत्मावलंबन यांची जाणीव करून दिली. परंपरा, पोथीनिष्ठता, परमेश्वर विषयक कल्पना यांना नकार देण्यास सांगितले. जो धर्म वर्तमान समृध्द करण्यासाठी व्यक्तीला, मानसाला प्रोत्साहन देतो, जो त्यांच्या मनात आशा पल्लवित करतो व फुलवितो तोच खरा धर्म होय. **खरा तो एकची धर्म | जगाला प्रेम अर्पावे |** असे साने गुरूजी म्हणतात ते उगीच नव्हे ! ज्या धर्मात माणसाच्या विकासाला वाव नाही, तो धर्म नसून निव्वळ ढोंग आहे अशी शिकवण डॉ. आंबेडकरांनी दिली आहे. लोकशाही समाजवाद आणि बुध्दविचार प्रणाली हाच आंबेडकरी विचारांचा मुख्य गाभा आहे.

दलित साहित्य हे अज्ञान, दारिद्र्य, पिळवणूक यांना नकार देते आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय ही मुल्ये स्विकारते. थोडक्यात सांगायचे म्हणजे आत्मोध्दार हेच दलित साहित्याचे प्रयोजन आहे. शेकडो-हजारो वर्षे पिढ्यानपिढ्या सोसत आलेल्या दैन्य, दुःख, अन्याय, अत्याचार यापासून स्वतःला मुक्त करण्यासाठी संघर्षसिध्द झालेल्या समाजाचा उद्गार म्हणजे दलित साहित्य होय.

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. या भूमीत अनेक संत होवून गेले. संतांनी महाराष्ट्रात खरी आध्यात्मिक लोकशाही निर्माण केली. सर्वच संतांनी समाज सुधारकांची भूमिका निभावल्याचे दिसून येते. संत तुकारामाच्या अनेक अभंगातून दया, क्षमा, शांती, वर्णभेद, गरीब जण या संबंधी कळवळा व्यक्त झालेला पहावयास मिळतो. ते म्हणतात की, सर्व प्राणीमात्रावर प्रेम करा. त्यांच्यातच भगवंत पहा. साधुची लक्षणे सांगाताना ते म्हणतात,

जे का रंजले गांजले || त्यासी म्हणे जो आपुले |
तोचि साधू ओळखावा | देव तेथेचि जाणावा |

जो दीन-दुबळ्यांना प्रेमाने आपले म्हणतो त्यालाच साधू समजावे. त्याच्या ठिकाणीच देवाची वस्ती आहे असे जाणावे. निराधरांना जो प्रेमाने हृदयी धरतो, आपले समजून त्यांच्यावर प्रेम करतो, पुत्राप्रमाणे दया दाखवतो, तो साक्षात भगवंतांची मूर्तीच असतो. **दया तिचे नाव | भूतांचे पालन | आणिक निर्दळण कंटकाचे |** या अभंगातून मांडलेली विचारधारा कुणाचाही व्देष न करता समाज परिवर्तनाची दिशाच होती. समाजकंटकांना त्यांच्याच भाषेत इशारे देवून अज्ञानी समाजाला जागृत करणारी विचारधारा होती.

छत्रपती शिवाजी महाराज संत तुकारामाचे किर्तन ऐकण्यास लोहगावाला जात असत. समता, एकता व विश्वबंधुत्वाने स्वराज्य निर्माण करण्याची तुकोबांनी शिवरायांना मार्गदर्शनातून वाट करून दिली. स्त्रीयांविषयी उदात्त व नैतिकतेचा आदर्श सांगताना ते म्हणतात,

पराविया नारी रखुमाई समान | गेले ते मनेयोनी ढायिचेसे |

शिवरायांनी तोच आदर्श घेवून, स्त्रीला देवून तीचे रक्षण केले. स्वराज्य निर्मितीसाठी तुकारामांनी समता व एकतेचा महामंत्र दिला आहे.

विष्णूमय जग वैष्णवांचा धर्म | भेदाभेद भ्रम अमंगळ |

लहान-थोर, जात-पात असा कोणताही भेद न करता अठरापगड जातीतील मावळा वारकारी बनला. अन्यायाविरुध्द पेटून उठविण्याचे काम करून तुकारामांनी वारकऱ्यांना सामाजिक जागृतीची जाणीव करून दिल्याचे दिसून येते.

संत ज्ञानेश्वर महाराजांनी देखील जगाच्या कल्याणासाठी पसायदान लिहिले आहे. **आता विश्वात्मके देवे | येणे वाग्यज्ञ तोषावे | तोषेनी मज द्यावे | पसायदान हे |** असे समाज हिताचे मागणे मागितले आहे. **हे विश्वची मांझे घर** - अशी धारणा व्यक्त केली आहे. शिवाय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी संपूर्ण भारतभर एकता प्रस्थापित व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. **या भारतात बंधुभव नित्य वसू दे | दे वरचि असा दे | हे सर्व पंथ, संप्रदाय एक दिसू दे | मतभेद नसू दे |**

जगभरातील मुक्तीदाते मानव मुक्तीसाठी अविरतपणे लढत राहिलेले दिसून येतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जसे भारतासाठी लढले तसे दक्षिण आफ्रिकेचे नेल्सन मंडेला यांनी वर्णव्देषाविरूध्द लढा उभारून गोऱ्या लोकांची जुलूमी राजवट उलथून टाकली आणि दक्षिण आफ्रिकेत स्वातंत्र्याचे निशाण फडकविले. त्यांच्या या ऐतिहासिक कार्याचा गौरव करतान हिरा बनसोडे 'फिर्याद' काव्यसंग्रहात म्हणतात की,

नेल्सन मंडेला द. आफ्रिकेचा क्रांतीसूर्य,
डोंगराची छाती फोडावी तसेच,
जुलूमावर प्रहार करीत, गोऱ्यांच्या वर्ण वर्चस्वावर,
विजांचे आसूड फटकारीत,

नि पुकारलास लढा, गुलामगिरी विरूध्द.

या लढ्यात नेल्सन मंडेला यांनी २७ वर्ष तुरूंगवास भोगला. काळे व गोरे अशा वर्णव्देषावर गुलामगिरीत पडलेला दक्षिण आफ्रिका त्यांनी मुक्त केला. शेवटी नेल्सन मंडेला दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्राध्यक्ष झाले. या युगपुरूषाला वंदन करताना हिरा बनसोडे म्हणतात की,

स्वातंत्र्य, समता आणि मानवतेसाठी
आयुष्य पणाला लावणाऱ्या महात्म्यांच्या भाळावर
नेहमी वनवासच लिहिलेला असतो रे !
पण मंडेला .... फुले-आंबेडकरांसारखाच,
तू जिगरबाज निघाल्यास बहादूरा.

